Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843
दैनिक
# जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे
। मंगळवार, दि. २१ एप्रिल २०२६ । वर्ष १ । अंक १६ । पाने २।
DIGITAL EDITION



सीएम परवानगी शिवाय मंत्रालयात प्रवेश नाही!
(पान २ वर)

Selected

## पंतप्रधानांच्या भाषणाविरोधात आयोगाला पत्र

नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १८ एप्रिलला देशाला उद्देशून संबोधन करताना आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन केले असा आरोप करत त्याची चौकशी केली जावी अशी मागणी करणारे पत्र सोमवारी ७००पेक्षा अधिक नागरिकांनी निवडणूक आयोगाला लिहिले. त्यामध्ये माजी सरकारी अधिकारी, शिक्षणतज्ज्ञ, कार्यकर्ते आणि पत्रकारांचा समावेश आहे. पंतप्रधानांचे भाषण दूरदर्शन, संसद टीव्ही आणि आकाशवाणीवरून प्रसारित करण्यात आले होते. हे भाषण पक्षीय प्रचारासाठी केलेले होते असा आरोप या नागरिकांनी केला आहे केरळ आणि पुद्दुचेरीमध्ये आदर्श आचारसंहिता लागू आहेराजकीय अर्थतज्ज्ञ परकला प्रभाकर, कार्यकर्ते योगेंद्र यादव, अर्थतज्ज्ञ जयती घोष, संगीतकार-लेखक टी. एम. कृष्णा, माजी केंद्रीय सचिव ई. ए. एस. सरमा, कार्यकर्ते हर्ष मंदर, पत्रकार परंजॉय गुहा ठाकुर्ता, शिक्षणतज्ज्ञ झोया भासद हसन आणि माजी मंत्री मदबसाद हसन यांच्यासह अन्य प्रतिष्ठित नागरिकांच्या या पत्रावर सह्या आहेत.

# एल-निनो'मुळे खरीप हंगामात पाच लाख हेक्टर क्षेत्रावरील पेरणीत घट

## एल-निनो'मुळे पर्जन्यमान कमी होण्याची शक्यता: दत्तात्रय भरणे यांची माहिती

जन सम्राट टाईम्स

मुंबई : 'एल-निनो'मुळे पर्जन्यमान कमी होण्याची शक्यता असून, खरीप हंगामातील पेरणी क्षेत्रात पाच लाख हेक्टरची घट होणार आहे. त्यानुसार राज्याच्या कृषी विभागाने १ लाख ४५ हेक्टर क्षेत्रावर पेरण्यांचे नियोजन केले असून, सोयाबीन, भात, मका, तूर, उडीद, कापूस आणि ऊस या प्रमुख पिकांच्या पेरणींचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. एल-निनोचा शेतीवर होणारा संभाव्य परिणाम, पर्जन्यमानाची स्थिती आणि त्यानुसार पीक पद्धतीचे नियोजन करण्यासंदर्भात कृषी विभागाच्या वतीने राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन सोमवारी करण्यात आले. त्यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी या नियोजनाबाबतची माहिती दिली. राज्याचे कृषी आयुक्त सूरज मांढरे, महाबीजचे व्यवस्थापकीय संचालक दिलीप स्वामी, महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक अशोक काकडे उपस्थित होते. 'कमी पावसाच्या शक्यतेनुसार शेतीसाठी पाणी, बी बियाणे, कीटकनाशके यांचे नियोजन करण्यात येत आहे,' असे भरणे यांनी स्पष्ट केले. ते म्हणाले, 'एल निनोच्या प्रभावामुळे यंदा सरासरीच्या ९२ टक्के पाऊस पडणार असल्याचा अंदाज आहे. या बदलाचा खरीप हंगामावर परिणाम होण्याची शक्यता आहे. राज्यात दर वर्षी सरासरी दीड लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी होते. यंदा पाच लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणीची तूट होईल. खरीप हंगामात सुमारे १४५.२० लाख हेक्टर क्षेत्रावर सोयाबीन, भात, मका, तूर, उडीद, कापूस आणि ऊस या प्रमुख पिकांच्या पेरणीचे ध्येय निश्चित करण्यात आले आहे. खरीप हंगामात शेतकऱ्यांना खते आणि बियाणे वेळेत आणि पुरेशा प्रमाणात उपलब्ध व्हावेत, यासाठी विभागाला सूचना देण्यात आल्या आहेत.''एल निनो' स्थितीमुळे पावसात अनियमितता व दुष्काळ परिस्थिती उद्भवू शकते. या पार्श्वभूमीवर कृषी विभागातर्फे राज्यात हवामान प्रतिरोधक बियाण्यांचा वापर, उताराला आडवी पेरणी, बीबीएफ तंत्राचा अवलंब, शेततळ्यांची निर्मिती, सेंद्रिय खतांचा



वापर, तसेच पाणी बचत करणाऱ्या सिंचन पद्धतींवर विशेष भर दिला जाणार आहे. यासाठी महाकृषी अॅपच्या माध्यमातून हवामानास अनुकूल कृषी तंत्रज्ञानाची प्रात्यक्षिके घेतली जात आहेत,' असे भरणे यांनी सांगितले.यंदा बियाण्यांची गरज २०.१७ लाख क्विंटल असून, २८.०५ लाख क्विंटल बियाणे उपलब्ध आहे. तसेच खरीप हंगामासाठी राज्यास ४८.८० लाख टन खतांचा साठा मंजूर असून, आतापर्यंत २५.१७ लाख टन खते उपलब्ध आहेत. खतांच्या आणखी मागणी संदर्भात केंद्र सरकारशी पत्र व्यवहार सुरू आहे.नैसर्गिक आपत्तीमुळे फेब्रुवारी २०२५ पासून राज्यातील १३६.२८ लाख शेतकऱ्यांचे १०५.८८ लाख हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले आहे. या नुकसानीपोटी शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी शासनाकडून २० हजार १९६ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. तसेच नुकतेच मार्च आणि एप्रिल महिन्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे २ लाख १५ हजार हेक्टर नुकसान झाले असून, बाधित शेतकऱ्यांना मदतीसाठी नुकसानभरपाई संदर्भातील निर्णय घेण्यात आले आहेत. तसेच गेल्या आठवड्यात झालेल्या अवकाळी पावसाचे पंचनामे सुरू असल्याचे मंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले. राज्य शासनाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजना जाहीर केली असून, ३० जूनच्या आधी शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यात येणार आहे. या कर्जमाफीसंदर्भातील शेतकऱ्यांची माहिती संकलित करण्याचे आणि निकष ठरवण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे, असेही दत्तात्रय भरणे यांनी स्पष्ट केले. एल-निनोच्या प्रभावाच्या पार्श्वभूमीवर खरीप हंगामात शेतकऱ्यांना खते आणि बियाणे वेळेत, पुरेशा प्रमाणात उपलब्ध होण्याच्या दृष्टीने नियोजन केले आहे.

### नुकसानीचे पंचनामे सुरू

नैसर्गिक आपत्तीमुळे फेब्रुवारी २०२५ पासून राज्यातील १३६.२८ लाख शेतकऱ्यांचे १०५.८८ लाख हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले आहे. या नुकसानीपोटी शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी शासनाकडून २० हजार १९६ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. तसेच नुकतेच मार्च आणि एप्रिल महिन्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे २ लाख १५ हजार हेक्टर नुकसान झाले असून, बाधित शेतकऱ्यांना मदतीसाठी नुकसानभरपाई संदर्भातील निर्णय घेण्यात आले आहेत. तसेच गेल्या आठवड्यात झालेल्या अवकाळी पावसाचे पंचनामे सुरू असल्याचे मंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज ज

# रेल्वेतून पडून सुरक्षारक्षक कांबळे यांचा दुर्दैवी मृत्यू

## कामाच्या अतिताणामुळे मृत्यू

जन सम्राट टाईम्स



मोहने : मोहने येथील रहिवासी आणि कुटुंबाचा आधारस्तंभ असलेले सुरक्षारक्षक भाऊराव कांबळे यांचा रेल्वेतून पडून दुर्दैवी मृत्यू झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. शुक्रवारी घडलेल्या या घटनेमुळे कांबळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, त्यांच्या मृत्यूमागे कामाच्या अतिताणाची गंभीर पार्श्वभूमी असल्याचा आरोप भाऊराव चे भाऊ श्रीकांत कांबळे व नातेवाईकांनी केला आहे. भाऊराव कांबळे हे वसंत व्हॅली येथे सुरक्षारक्षक म्हणून कार्यरत होते. सलग दोन दिवस ते कामावरच होते आणि बारा-बारा तासांच्या दोन शिफ्ट पूर्ण केल्यानंतरही एजन्सीच्या आग्रहाखातर त्यांनी तिसरी शिफ्ट स्वीकारली होती. अत्यंत थकलेल्या अवस्थेत शुक्रवारी आंघोळ करून पुन्हा कामावर येतो असे सांगून ते सकाळी घरी परतत होते.
त्यांनी वसंत व्हॅली सोसायटीहून शहाडपर्यंत रिक्षाने प्रवास केला आणि तेथून आंबिवलीकडे जाण्यासाठी रेल्वेत चढले. मात्र शहाड-आंबिवली दरम्यान उल्हास नदीवरील पुलावरून रेल्वे जात असताना त्यांचा तोल जाऊन ते खाली कोसळले. शनिवारी त्यांचा मृतदेह उल्हास नदीत आढळून आला, पोलिसांच्या प्राथमिक अहवालातून रेल्वेतून पडून मृत्यू झाला असावा असा निष्कर्ष काढण्यात आला आहे.

### कामाच्या परिस्थितीवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह

जर त्यांना एवढा कामाचा ताण दिला नसता, तर आज भाऊराव आपल्यात असते." त्यांनी संबंधित सुरक्षा एजन्सी मालकावर गुन्हा दाखल करण्याची ठाम मागणी केली आहे. या घटनेने सुरक्षा रक्षकांच्या कामाच्या परिस्थितीवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उभे केले आहे. नियमानुसार आठ तासांची शिफ्ट असतानाही अनेक ठिकाणी कामगारांकडून 12-12 तास, कधी कधी 36 ते 48 तास सलग काम करून घेतले जाते. अशा अमानवी ताणामुळे कामगारांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत असून, काही वेळा त्याचे दुर्दैवी परिणाम जीवघेणे ठरत आहेत.

# पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते NCMC 700 कार्डचे वाटप

जन सम्राट टाईम्स




पाळधी/धरणगाव/जळगाव | प्रतिनिधी दि. 20 एप्रिल - एसटी ही ग्रामीण भागातील सर्वसामान्यांची जीवनवाहिनी असून तिला डिजिटल स्वरूप देणे ही काळाची गरज आहे. यामुळे प्रवाशांना अधिक सुलभ, सुरक्षित आणि पारदर्शक सेवा मिळेल तसेच एसटीची कार्यप्रणाली अधिक गतिमान व प्रवाशाभिमुख होईल, असे प्रतिपादन जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी केले. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने 'RuPay On-The-Go' प्रणालीवर आधारित NCMC (नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड) स्मार्ट कार्ड योजना सुरू केली असून या उपक्रमाचे त्यांनी स्वागत केले. धरणगाव तालुक्यातील पाळधी बसस्थानक येथे आयोजित कार्यक्रमात पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते सुमारे 700 लाभार्थ्यांना सवलतीच्या प्रवासाचे स्मार्ट कार्ड वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना शासनाच्या योजनांचा थेट लाभ मिळत असून जनजागृतीलाही चालना मिळत आहे. या उपक्रमांतर्गत "अमृत ज्येष्ठ नागरिक योजना", "महिला सन्मान योजना" तसेच दिव्यांग प्रवासी सवलत योजना यांचा समावेश असून ज्येष्ठ नागरिक, महिला, विद्यार्थी व दिव्यांग बांधवांना मोठा दिलासा मिळत आहे. यावेळी पालकमंत्री म्हणाले की, "75 वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवास, महिलांना 50 टक्के सवलत आणि दिव्यांग बांधवांसाठी विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.
या योजना शासनाची सामाजिक बांधिलकी दर्शवतात. प्रत्येक पात्र व्यक्तींनी पुढाकार घेऊन आपले कार्ड काढून घ्यावे आणि या योजनांचा पुरेपूर लाभ घ्यावा असे आवाहनही पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी केले. या स्मार्ट कार्डद्वारे 'वॉलेट टॉप-अप' सुविधा उपलब्ध असून किमान 100 रुपयांपासून रिचार्ज करता येणार आहे. बसमधील ई-तिकीट मशीन, संकेतस्थळ, मोबाईल अॅप व अधिकृत केंद्रांमार्फत ही सेवा मिळणार आहे. आधार संलग्नतेमुळे प्रवास अधिक सुरक्षित व पारदर्शक होणार आहे. जिल्ह्यातील एसटी आगार व बसस्थानकांवर या कार्डची नोंदणी व वितरण प्रक्रिया सुरू असून प्रवाशांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन विभाग नियंत्रक यांनी केले आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जीपीएस ग्रुपचे दिलीप माळी यांनी केले. प्रास्ताविक बसस्थानक नियंत्रक शिवाजी पाटील यांनी केले तर आभार सोपान माळी यांनी मानले. यांची होती उपस्थिती या वेळी शिवाजी पाटील, माजी सरपंच अरुण पाटील, प्रशांत झंवर, दिलीप माळी, सोपान माळी, आबा माळी, ग्रामपंचायत सदस्य चंदू इंगळे, अनिल माळी, समाधान माळी यांच्यासह मोठ्या संख्येने ज्येष्ठ नागरिक, महिला, विद्यार्थी व दिव्यांग उपस्थित होते.

# पोलीस अधीक्षकपदी श्रीकांत धिवरे; डॉ. रेड्डी यांची बदली

जन सम्राट टाईम्स



जळगाव : महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाने २० एप्रिल २०२६ रोजी जारी केलेल्या आदेशानुसार राज्यातील पोलीस अधिकाऱ्यांच्या मोठ्या प्रमाणात बदल्या करण्यात आल्या आहेत. महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ अंतर्गत ही प्रक्रिया राबविण्यात आली असून, प्रशासन अधिक सक्षम करण्याचा उद्देश असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. या आदेशानुसार, जळगाव जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षकपदी धुळेचे विद्यमान एसपी श्रीकांत धिवरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तर विद्यमान एसपी डॉ. महेश्वर रेड्डी यांची बदली पुणे येथील राज्य गुन्हे अन्वेषण विभाग (CID) मध्ये करण्यात आली आहे.
दरम्यान, सातारा येथील पोलीस अधीक्षक तुषार दोषी यांची बदली सांगली येथे करण्यात आली असून, त्यांच्या जागी पुण्यातील पोलीस उप आयुक्त निखिल पिंगळे यांची सातारा येथे नियुक्ती करण्यात आली आहे. सांगलीचे विद्यमान एसपी संदीप घुगे यांना मुंबई येथे राज्य गुप्तवार्ता विभागात पोलीस उप आयुक्त (सुरक्षा) म्हणून नेमण्यात आले आहे.
तसेच, कोल्हापूर येथील पोलीस अधीक्षक योगेश गुप्ता यांना तात्पुरत्या स्वरूपात गडचिरोली परिक्षेत्राचे पोलीस उप महानिरीक्षक म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे. गडचिरोलीचे एसपी निलोत्पल यांची बदली कोल्हापूर येथे करण्यात आली असून, गडचिरोलीचे अपर पोलीस अधीक्षक एम. सेरा यांना पदोन्नती देत एसपीपदी नियुक्त करण्यात आले आहे. याशिवाय, पुण्यातील पोलीस उप आयुक्त राजकुमार शिंदे यांना वाशिम येथे पोलीस अधीक्षक म्हणून बदली देण्यात आली आहे. या सर्व बदल्यांमुळे राज्यातील पोलीस प्रशासनात मोठे फेरबदल झाले असून, कायदा व सुव्यवस्था अधिक प्रभावीपणे राखण्यासाठी शासनाने हे पाऊल उचलल्याचे सांगितले आहे.

# वारकऱ्यांच्या व्यासपीठावर मला उर्जा मिळते" : पालकमंत्री



जन सम्राट टाईम्स

पाळधी जळगाव : दिनांक 20 एप्रिल -"वारकऱ्यांचे व्यासपीठ हे संतांच्या विचारांचे व्यासपीठ आहे. या ठिकाणी राजकारण नको. येथे येताना मला नेहमीच वेगळी ऊर्जा मिळते. संतांचे विचार केवळ ऐकण्यासाठी नाहीत, तर आचरणात आणण्यासाठी आहेत. याच विचारांतून माणूस आणि समाज घडतो. वारकरी संप्रदाय ही आपली संस्कृती आणि ओळख असून तिचे जतन करणे ही आपली जबाबदारी असल्याचे प्रतिपादन पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महंत श्रीकांतदासजी महाराज होते. पालकमंत्री गुलाबराव पाटील पुढे म्हणाले की, तरडे सारख्या पवित्र भूमीत परमार्थाचे जे कार्य सुरू आहे, ते समाजासाठी प्रेरणादायी आहे. संतांच्या मार्गावर चालणारा समाजच खऱ्या अर्थाने प्रगती करतो असेही त्यांनी भावनिक शब्दांत सांगितले. धरणगाव तालुक्यातील श्रीक्षेत्र तरडे खुर्द येथे वारकरी परंपरेच्या भक्तीमय वातावरणात वारकरी गुणीरत्न पुरस्कार व महंत पदवी दीक्षाप्रदान सोहळा उत्साहात पार पडला. या प्रसंगी पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा पालकमंत्री ना. गुलाबराव पाटील यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमात ह.भ.प. बाबुलाल सीताराम पाटील (नाना) यांना संत नामदेव खालसा आखाड्याचे प्रमुख हभप महामंडलेश्वर अनंतदासजी महाराज यांच्या हस्ते महंत पदवी व वारकरी गुणीरत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला. यांची होती उपस्थिती कार्यक्रमाला महंत प्रणवगिरी बाबाजी, महंत नागेशानंदजी, महंत योगी ऋषिनाथजी, हभप सौरभ महाराज, हभप नवनाथ महाराज, हभप ज्ञानेश्वर महाराज जळकेकर, गौप्रेमी गजानन वरसाडेकर, हभप गोविंद महाराज पाचोरा, हभप रुपचंद बाबा, हभप कौतिक महाराज लोणीकर, स्वयंभू त्रिवेणेश्वर महादेव संस्थानाधिपती निमगाव, हभप कृष्णा महाराज, हभप रमेश महाराज तसेच नाशिकहून आलेले विविध संत-महंत मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वेळी संत नामदेव खालसा आखाड्याच्या वतीने ना. गुलाबराव पाटील यांचा सत्कार करण्यात आला. तसेच पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते हभप बाबुलाल नाना यांचा विशेष सन्मान करण्यात आला. सुमारे दीड तास चाललेल्या या कार्यक्रमात ना. गुलाबराव पाटील हे पूर्ण वेळ श्रोत्यांमध्ये बसून सहभागी झाले होते. व्यासपीठावर केवळ वारकरी, साधूसंत व कीर्तनकार मंडळी विराजमान होती. कार्यक्रमाची सांगता पसायदानाने झाली. सूत्रसंचालन हभप प्रा. सी. एस. पाटील यांनी केले. कार्यक्रमानंतर पंचक्रोशीतील ग्रामस्थांसाठी आमरस-पुरणपोळीच्या महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रम यशस्वितेसाठी तरडे येथील तरुण मित्रमंडळ, संत तानसेन भजनी मंडळ व महिला मंडळ यांनी परिश्रम घेतले.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज ज

# "छावा करंडक 2026" क्रिकेट स्पर्धा संपन्न; 22 महाविद्यालयांचा सहभाग

## आयन इलेव्हन विजेता; युवकांच्या एकतेचा आणि क्रीडाजिद्दीचा रंगतदार उत्सव

जन सम्राट टाईम्स

छावा स्वराज्य सेना, पिंपरी-चिंचवड शहर यांच्या वतीने आयोजित "छावा करंडक 2026" ही भव्य क्रिकेट स्पर्धा ११ ते १७ एप्रिल दरम्यान संत तुकाराम नगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मैदान येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. पुणे जिल्ह्यातील तब्बल २२ महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवत उत्कृष्ट खेळाचे दर्शन घडवले. अंतिम सामन्यात आयन इलेव्हन (अजम कॅम्पस, पुणे) संघाने शानदार कामगिरी करत विजेतेपद पटकावले. विजेत्या संघाला ₹२५,५५५ रोख रक्कम व ट्रॉफी प्रदान करण्यात आली. डीआयटी टायटन्स (डी वाय पाटील कॉलेज) संघाने उपविजेतेपद मिळवत ₹१५,५५५ व ट्रॉफी पटकावली, तर दादा इलेव्हन (डी वाय पाटील कॉलेज, पिंपरी) संघ तृतीय क्रमांकावर राहिला. स्पर्धेच्या पारितोषिक वितरण सोहळ्यात प्रथम क्रमांकाचे पारितोषिक युवा उद्योजक अमित भोसले व विशाल मासुळकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक छावा स्वराज्य सेनेचे संस्थापक




राम घायतिडक पाटील, प्रदेशाध्यक्ष राजेंद्र पडवळ व महिला प्रदेशाध्यक्ष शितलताई हुलवळे यांच्या हस्ते देण्यात आले.
मॅन ऑफ द सिरीज, बेस्ट बॉलर आणि मॅन ऑफ द मॅच हे विशेष पुरस्कार सुशील कोटियन, सोमनाथ पवार, प्रदीप तरस व दीपक शेलार यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. या स्पर्धेला पुणे जिल्ह्यातील अनेक मान्यवरांनी उपस्थिती लावत खेळाडूंना प्रोत्साहन दिले. एड. गणेश कांबळे, सौरभ सगर, अतुल चव्हाण, शैलेंद्र पडवळ, विजय माने, किशोर चौधरी यांची उपस्थिती विशेष लक्षवेधी ठरली. कार्यक्रमाचे स्वागत शहराध्यक्ष अतुल चव्हाण यांनी केले. स्पर्धेदरम्यान उद्योजक विशाल मासुळकर यांनी खेळाडूंच्या जिद्दीचे कौतुक केले, तर प्रदेशाध्यक्ष राम पाटील यांनी "जिंकणे-हरणे हा खेळाचा भाग असून प्रत्येक सामना नवे धडे देतो," असे सांगत सर्व संघांचे अभिनंदन केले

### कार्यकर्त्यांनी सहभाग नोंदवत स्पर्धा यशस्वी

या स्पर्धेचे यशस्वी आयोजन छावा स्वराज्य सेना विद्यार्थी संघटनेचे शहर कार्याध्यक्ष प्रतीक पडवळ यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. प्रथमेश जाधव, दिनेश धोत्रे, स्वप्निल वाघमारे, खुशबीर माळी, गणेश खोकले, अवधूत कुंभार, चौधरी आदी कार्यकर्त्यांनी मोलाचा सहभाग नोंदवत स्पर्धा यशस्वी केली.एकूणच "छावा करंडक 2026" ही केवळ क्रिकेट स्पर्धा न राहता युवकांच्या एकतेचा, क्रीडाजिद्दीचा आणि संघभावनेचा प्रेरणादायी उत्सव ठरला.

# आंबेडकर चळवळीचे ज्येष्ठ नेते मुकुंद सपकाळे यांच्या वरील प्राणघातक हल्ल्याप्रकरणी कारवाईची मागणी

## मुख्य आरोपी विशाल अहिरेसह साथीदारांवर 'मोका' अंतर्गत कारवाईचा आग्रह








जन सम्राट टाईम्स

जळगाव : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीचे शहराध्यक्ष तथा आंबेडकर चळवळीचे ज्येष्ठ नेते मुकुंद सपकाळे यांच्यावर झालेल्या प्राणघातक हल्ल्याच्या निषेधार्थ जळगाव शहरातील विविध सामाजिक संघटनांनी एकत्र येत जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निषेध आंदोलन केले. यावेळी जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी यांना निवेदन सादर करत मुख्य आरोपी विशाल राजू अहिरे व त्याच्या साथीदारांना तात्काळ अटक करून त्यांच्यावर संघटित गुन्हेगारी प्रतिबंधक कायद्यांतर्गत (मोका) कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, ११ एप्रिल रोजी दुपारी सुमारे १.३० वाजता मुकुंद सपकाळे हे रिंगरोडने जात असताना ५ ते ६ मोटारसायकलींवर आलेल्या हल्लेखोरांनी त्यांची गाडी अडवून चारही बाजूंनी घेराव घातला. त्यानंतर दगडफेक करत वाहनाच्या काचा फोडल्या आणि सपकाळे यांच्यावर प्राणघातक हल्ला करून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न करण्यात आला. या हल्ल्यात विशाल अहिरे, पराग लोहार यांच्यासह इतर आरोपी सहभागी असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या घटनेमुळे शहरात मोठ्या प्रमाणावर दहशतीचे वातावरण निर्माण झाले असून डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेले कवी संमेलन, व्याख्याने व इतर सांस्कृतिक कार्यक्रम रद्द करावे लागल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. सामाजिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी आरोप केला आहे की, घटनेला अनेक दिवस उलटूनही मुख्य आरोपींसह इतरांना अटक करण्यात आलेली नाही. उलट फिर्यादी व साक्षीदारांना धमकावण्याचे प्रकार सुरू असल्याचा गंभीर आरोपही करण्यात आला आहे. आरोपींवर यापूर्वीही गंभीर गुन्हे दाखल असल्याचे सांगत त्यांच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई न झाल्यानेच हा प्रकार घडल्याचा दावा करण्यात आला. "सण-उत्सवाच्या काळात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी गुन्हेगारांवर प्रतिबंधात्मक कारवाई करणे आवश्यक असते. मात्र या प्रकरणात ती करण्यात आली नाही. त्यामुळेच आरोपींना गुन्हा करण्याचे धाडस झाले," असे निवेदनात म्हटले आहे.

### फूट पाडण्याचा आरोप

या पार्श्वभूमीवर सर्व आरोपींना २४ तासांत अटक करून त्यांच्यावर स्थानबद्धतेची तसेच 'मोका' अंतर्गत कठोर कारवाई करण्यात यावी, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे. तसेच जर आरोपींना यापूर्वी जामिनावर सोडण्यात आले असेल, तर त्यांचा जामीन तात्काळ रद्द करण्यात यावा, अशी मागणीही करण्यात आली. जिल्हाधिकाऱ्यांनी या निवेदनाची गंभीर दखल घेऊन तातडीने योग्य ती कारवाई करावी, अशी अपेक्षा व्यक्त करत आंबेडकरी विचारधारेच्या कार्यकर्त्यांनी न्याय मिळेपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याचा इशाराही दिला आहे. या घटनेमुळे शहरातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून प्रशासनाने तत्काळ पावले उचलण्याची गरज व्यक्त होत आहे.

Selected


### 'धर्मवीर आनंद दिघे नागरी सहाय्यता कक्षा'चे उद्‌घाटन

पुणे : पुण्यातील शिवसेना भवन, सारसबाग येथे 'धर्मवीर आनंद दिघे नागरी सहाय्यता कक्षा' तसेच पश्चिम महाराष्ट्र विभागीय कार्यालयाचे उद्‌घाटन राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या हस्ते उत्साहात पार पडले. या कार्यक्रमात शिवसेना निष्ठावंत कार्यकर्त्यांचा 'धर्मवीर आनंद दिघे पुरस्कार' देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमात डॉ. नीलम गोरे यांच्या हस्ते विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना सन्मानित करण्यात आले. शैक्षणिक क्षेत्रात कामगिरीबद्दल अनिल गडकरी, सामाजिक व नागरी प्रश्नांवर कार्य केल्याबद्दल निलेश जगताप, वैद्यकीय क्षेत्रातील योगदानाबद्दल राजाभाऊ भिलारे, रक्तदान चळवळीत सातत्याने कार्य करणारे प्रकाश ढमढेरे, खेळाडूंना प्रोत्साहन देणारे शंकर संगम तसेच पक्ष संपर्क क्षेत्रातील कार्याबद्दल अनिल बटाने यांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन शिवसेना निवडणूक राज्य समन्वयक व राज्य कक्ष प्रमुख वैभव वाघ यांनी केले होते. उद्‌घाटन सोहळा व पुरस्कार वितरण समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी शिवसेना पुणे शहर प्रमुख नाना भानगिरे, सहसंपर्कप्रमुख अजय बापू भोसले, शिव कामगार सेना प्रदेश अध्यक्ष सुधीर कुरुमकर, आबा बागुल, सचिन मामा थोरात, सुनील जाधव, प्रमोद प्रभुणे, विश्वास दिघे, सागर घोलप यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जन सम्राट टाईम्स — ब्रेक न्यूज

# सहा कोटींच्या एक्स्टसी गोळ्यांसह 'ड्रग्ज क्वीन' अटकेत

## 4 हजार 'एमडी बटन' जप्त



जन सम्राट टाईम्स

मुंबई मुंबईतील नेस्को ड्रग्ज पार्टी प्रकरणाचा तपास अधिक गडद होत असताना पोलिसांनी मोठी कारवाई करत टिटवाळा परिसरातून 'ड्रग्ज क्वीन' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अश्विनी पॉल हिला अटक केली आहे. तिच्याकडून तब्बल 6 कोटी रुपये किमतीच्या सुमारे 4056 एक्स्टसी (एमडी) गोळ्या जप्त करण्यात आल्या आहेत. साकीनाका पोलिसांनी गुप्त माहितीच्या आधारे टिटवाळा येथे छापा टाकत अश्विनी फ्रान्सिस पॉल (वय 35) हिला तिच्या घरातून अटक केली. तिच्या ताब्यातून सुमारे 2.3 किलो वजनाच्या 'एमडी बटन' प्रकारातील ड्रग्जचा साठा जप्त करण्यात आला. न्यायालयाने तिला 22 एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणात आधी अटक करण्यात आलेल्या इरफान अन्सारीकडून 200 एक्स्टसी गोळ्या जप्त करण्यात आल्या होत्या. त्याच्या चौकशीतून सुफियानचा शोध लागला आणि पुढे या साखळीचा माग काढत पोलिसांनी अश्विनी पॉलपर्यंत पोहोचण्यात यश मिळवले.मूळची पुणे येथील अश्विनी पॉल ही पूर्वी नवी मुंबईतील डान्स बारमध्ये काम करत होती. काही वैयक्तिक कारणांमुळे ती वेगळी राहत असून, तिचा गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेला बॉयफ्रेंडही सध्या पोलिसांच्या ताब्यात आहे. अवघ्या दोन महिन्यांपूर्वी ती कल्याण-टिटवाळा परिसरात राहायला आली होती.

### गुप्त ऑपरेशन; महत्त्वाचे पुरावे जप्त

पोलिसांनी अत्यंत गुप्ततेने ही कारवाई पार पाडत इमारतीतील सीसीटीव्ही कॅमेरे तात्पुरते बंद करून छापा टाकला. तिच्या घरातून 5 मोबाईल फोन आणि 8 सिमकार्ड जप्त करण्यात आले आहेत. जप्त केलेल्या गोळ्यांवर 'मर्सिडीज', 'डॉलर' यांसारखी चिन्हे कोरलेली असल्याचे आढळले आहे.ही ड्रग्ज नेमकी कुठे तयार झाली, या रॅकेटमध्ये आणखी कोण सामील आहेत, तसेच पुणेसह इतर ठिकाणी याचे धागेदोरे आहेत का, याचा सखोल तपास सुरू असल्याची माहिती अमली पदार्थ विरोधी पथकाचे उपायुक्त नवनाथ ढवळे यांनी दिली आहे.

# संविधान जागर अभियानांतर्गत एस. एन. नांदेडकर सरांचा सन्मान

## संविधानिक मूल्यांची जपणूक व विद्यार्थ्यांमध्ये जागृती घडविल्याबद्दल गौरव

जन सम्राट टाईम्स

पुणे : महाराष्ट्रात राबविण्यात येत असलेल्या संविधान जागर अभियानांतर्गत संविधान अभ्यासक व मार्गदर्शक शिक्षक म्हणून संघशिल भद्रे उर्फ एस. एन. नांदेडकर सर यांचा सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये संविधानिक मूल्यांची जाणीव निर्माण करण्यासाठी त्यांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत हा सन्मान प्रदान करण्यात आला. स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना केवळ अभ्यासापुरते मर्यादित न ठेवता त्यांच्यामध्ये संविधानाबद्दल आदर, समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांची रुजवण करण्यासाठी नांदेडकर सरांनी सातत्याने प्रयत्न केले आहेत. त्यांच्या या कार्यामुळे अनेक विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव वाढली असून ते जबाबदार नागरिक म्हणून घडत असल्याचे मान्यवरांनी नमूद केले. या सन्मान सोहळ्याला विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभली. 'आज का आनंद' व 'संध्यानंद'चे संपादक श्याम अग्रवाल, 'भारतीय संविधान आणि लोकशाही' या पुस्तकाचे लेखक प्रा. डॉ. जयसिंह ओहोळ,



सुनिता सुभाष ओहोळ, सुरेश राजपुरे सर, समीर थोरात सर, प्रा. काकासाहेब लकारे आदी उपस्थित होते. कार्यक्रमात उपस्थितांनी नांदेडकर सरांच्या कार्याचे कौतुक करत त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. सन्मानपत्रात महात्मा ज्योतिराव फुले यांनी स्त्रिया व बहुजनांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी केलेल्या कार्याचा उल्लेख करण्यात आला, तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या माध्यमातून सर्वांना समान शिक्षणाचा हक्क दिला, याचीही गौरवपूर्ण नोंद घेण्यात आली. या महान व्यक्तींच्या आदर्शांवर आधारित शिक्षण देत विद्यार्थ्यांना घडविण्याचे कार्य नांदेडकर सर करत असल्याबद्दल त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. संविधान जागर अभियानाच्या माध्यमातून राज्यभरात संविधानाबद्दल जागरूकता निर्माण करण्याचे काम सुरू असून, या अभियानात विविध क्षेत्रातील तज्ज्ञ, अभ्यासक आणि सामाजिक कार्यकर्ते सहभागी झाले आहेत. या उपक्रमाला डॉ. नितीन राऊत आणि तुषार गांधी यांचे मार्गदर्शन लाभत आहे. तसेच निमंत्रक समितीत न्यायमूर्ती बी. जी. कोळसे पाटील, डॉ. राम पुनियानी, न्या. ए. एम. ठिपसे, न्या. टी. व्ही. नलावडे, धनाजी गुरव, नीरज जैन आदी मान्यवरांचा सहभाग आहे. या कार्यक्रमासाठी सुरेश तान्हुबाई बाबुराव राजपुरे यांचे विशेष सहकार्य लाभले. दरम्यान, या सन्मानामुळे एस. एन. नांदेडकर सरांच्या कार्याला नवे बळ मिळणार असून, संविधान जागरूकतेच्या क्षेत्रात त्यांनी केलेल्या योगदानाची समाजात व्यापक दखल घेतली जात आहे.

# धडाकेबाज कारवाई! ३२ गुन्ह्यांचा सराईत आरोपी जेरबंद

जन सम्राट टाईम्स

पाळधी/धरणगाव: धरणगाव तालुक्यातील पाळधी परिसरात घडलेल्या गंभीर गुन्ह्याचा वेगाने छडा लावत पोलिसांनी अल्पावधीत आरोपीला अटक करत उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. या प्रभावी आणि तत्पर कारवाईबद्दल एपीआय कंडारे यांचा जिल्हा पोलीस अधीक्षक (एसपी) यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. मिळालेल्या माहितीनुसार, धरणगाव पोलीस स्टेशन हद्दीत दाखल झालेल्या गुन्ह्यात मयत व्यक्तीचा मृतदेह हा धरणगाव शिवारातील रेल्वे रुळांवर संशयास्पद स्थितीत



आढळून आला होता. या घटनेने परिसरात खळबळ उडाली होती. पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत पंचनामा करून तपासाची सूत्रे हाती घेतली. तपासादरम्यान पोलिसांनी फिर्यादी महिला व साक्षीदारांचा शोध घेत घटनाक्रमाची सखोल माहिती मिळवली. विविध तांत्रिक आणि मानवी स्रोतांचा वापर करत आरोपीचा माग काढण्यात आला. गुन्हा दाखल होताच पोलिसांनी जलद गतीने तपास करत संशयिताला ताब्यात घेतले आणि चौकशीतून गुन्ह्याची उकल केली. त्यानंतर आरोपीस अटक करण्यात आली. विशेष म्हणजे अटक करण्यात आलेला आरोपी हा सराईत गुन्हेगार असून त्याच्यावर तब्बल ३२ गुन्हे दाखल असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यामुळे ही कारवाई अधिक महत्त्वाची मानली जात आहे. पोलिसांच्या या धडाकेबाज कारवाईमुळे परिसरात सुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. या उत्कृष्ट कामगिरीची दखल घेत जिल्हा पोलीस अधीक्षक (एसपी) यांनी एपीआय कंडारे यांचा गौरव करून त्यांच्या कार्याचे कौतुक केले. या कारवाईमुळे पोलिस दलाची कार्यक्षमता आणि गुन्हेगारांविरोधातील कडक भूमिका पुन्हा अधोरेखित झाली आहे. दरम्यान, या प्रकरणाचा पुढील तपास सुरू असून संबंधितांकडून अधिक माहिती घेतली जात आहे

# सीएम परवानगीशिवाय मंत्रालयात प्रवेश नाही!

## नव्या नियमांवरून वाद



जन सम्राट टाईम्स

मुंबई: राज्याच्या मंत्रालय येथे वाढती गर्दी आटोक्यात आणण्यासाठी महायुती सरकारने कडक नियम लागू केले असून, आता मुख्यमंत्री परवानगीशिवाय बाहेरील व्यक्तींना प्रवेश दिला जाणार नाही. या नव्या निर्णयामुळे प्रशासनिक शिस्तीच्या नावाखाली जनतेपासून सत्तेचा दुरावा वाढत असल्याची टीका होत आहे. नवीन नियमांनुसार, कॅबिनेट बैठकीच्या दिवशी मंत्र्यांसोबत फक्त एकाच अधिकृत व्यक्तीला प्रवेशाची परवानगी असेल. इतर कोणालाही मंत्रालयात प्रवेशासाठी मुख्यमंत्री स्तरावरून पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक करण्यात आले आहे. या निर्णयामुळे राजकीय वर्तुळात चर्चा रंगली असून, विरोधकांनी सरकारवर निशाणा साधला आहे. सरकारचे म्हणणे आहे की मंत्रालयात मोठ्या प्रमाणात होणारी गर्दी कामकाजात अडथळा ठरत होती. विशेषतः सहावी आणि सातवी मजल्यांवर कार्यकर्ते, पदाधिकारी व खासगी सहाय्यकांची वर्दळ वाढल्याने फाईल्सची हालचाल व प्रशासनिक प्रक्रिया मंदावली होती. त्यामुळेच मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी कठोर निर्देश जारी करत प्रवेशावर निर्बंध घालण्याचा निर्णय घेतला. मात्र, या निर्णयावर टीकाकारांनी आक्षेप घेतला आहे. "हा निर्णय प्रशासन सुधारण्यासाठी नसून कार्यकर्ते आणि सामान्य नागरिकांची मंत्र्यांपर्यंत पोहोच मर्यादित करण्याचा प्रयत्न आहे," असा आरोप विरोधकांनी केला आहे. आधीच मंत्र्यांपर्यंत पोहोचणे अवघड असताना, आता या नियमांमुळे संवाद अधिकच कठीण होणार असल्याचे मत व्यक्त केले जात आहे. राजकीय विश्लेषकांच्या मते, या निर्णयामुळे लोकशाहीतील थेट संवादावर परिणाम होण्याची शक्यता आहे. नागरिकांच्या समस्या मांडण्यासाठी मंत्रालय हे महत्त्वाचे व्यासपीठ मानले जाते. मात्र, प्रवेशावर निर्बंध आल्याने हा संवाद कमी होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. दरम्यान, सरकारने मात्र हा निर्णय प्रशासन अधिक कार्यक्षम आणि शिस्तबद्ध करण्यासाठी घेतल्याचे स्पष्ट केले आहे. गर्दी कमी झाल्यास निर्णयप्रक्रिया वेगवान होईल, असा सरकारचा दावा आहे. एकूणच, मंत्रालयातील प्रवेशाबाबतचे हे नवे धोरण प्रशासनिक गरज की जनतेपासून वाढणारा दुरावा, यावरून राज्यात सध्या जोरदार राजकीय वाद रंगला आहे.

जन सम्राट टाईम्स — अँकर न्यूज

# जळगावात बेकायदेशीर पिस्तूलसह दोन आरोपी जेरबंद

## स्थानिक गुन्हे शाखेची धडक कारवाई; दहशत माजवण्याचा कट उधळला!

जन सम्राट टाईम्स

जळगाव : जळगाव जिल्ह्यात बेकायदेशीर अग्निशस्त्रांच्या माध्यमातून दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न उधळून लावत स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी) दोन आरोपींना अटक केली आहे. आरोपींकडून गावठी बनावटीचे पिस्तूल, जिवंत काडतुसे आणि मोटारसायकलसह सुमारे ६९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. जिल्ह्यात काही समाजकंटकांकडून बेकायदेशीर शस्त्रांचा वापर होत असल्याच्या पार्श्वभूमीवर पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी यांनी स्थानिक गुन्हे शाखेला अशा गुन्हेगारांवर कडक कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

गोपनीय माहितीच्या आधारे उमटी गावाकडून कृष्णापूरमार्गे चोपड्याकडे जाणाऱ्या दोन संशयित इसमांवर पोलिसांनी पाळत ठेवली होती. त्यानंतर संशयित मोटारसायकल (हिरोहोंडा, क्र. MH-19-9-9450) अडवून



दोघांना शिताफीने ताब्यात घेण्यात आले. अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे राहुल कुवरसिंग पावरा (वय २२, रा. उमटी, ता. चोपडा, जि. जळगाव) आणि गणपत प्रभाकर किर्तने (वय २८, रा. असोला जवळ बाजार, ता. औंढा नागनाथ, जि. हिंगोली) अशी आहेत. पंचांसमक्ष घेतलेल्या झडतीदरम्यान आरोपींकडून एक गावठी पिस्तूल, पाच जिवंत काडतुसे, दोन मोबाईल फोन आणि मोटारसायकल असा एकूण ६९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी हे विनापरवाना शस्त्र बाळगून दहशत माजवण्याच्या उद्देशाने फिरत असल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे.

### गुन्हेगारी पार्श्वभूमीचाही घेतला शोध

या कारवाईमुळे जिल्ह्यातील बेकायदेशीर शस्त्रधारकांमध्ये खळबळ उडाली असून पोलिसांनी अशा कारवायांवर आणखी कठोर कारवाईचा इशारा दिला आहे.या प्रकरणी चोपडा ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ५९/२०२६ नोंदवून शस्त्र अधिनियम कलम ३/२५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू असून आरोपींच्या गुन्हेगारी पार्श्वभूमीचाही शोध घेतला जात आहे.